ePaper

# ‘झोपलेला पक्ष’ म्हणत आदित्य ठाकरे कडाडले!



║ वर्ष - 8 I अंक - 32 ║ UDYAM-MH-26-0158827 ║

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- विष्यात रोबोट पदक जिंकू शकतात का?
- चोप्रा,फोगट अन् हॉकी सेमीफायनल!
- जिनिलीयाला दिल्या हटके शुभेच्छा
- पंतप्रधान शेख हसीना यांचा राजीनामा!

www.mahaenews.com ║ मंगळवार, दिनांक 6 ऑगस्ट 2024 ║ पुणे आवृत्ती ║ mahaenews.com ║ maha_enews ║ Mahaenews

## सुरक्षित जागेत कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

# नदीकाठच्या रहिवाशांचे कायमस्वरूपी पुनर्वसन!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

I पिंपरी I महाईन्यूज

**मुळा आणि पवना नदीला पूर आल्यानंतर नदीकाठच्या रहिवाशांना दर वर्षी स्थलांतरित व्हावे लागते. या संकटातून बाहेर काढण्यासाठी सुरक्षित जागेत कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याचा तोडगा काढण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूरग्रस्तांना दिले.**

पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीला पूर आल्याने मधुबन, मुळानगरसह नदीकाठच्या एक हजारहून अधिक रहिवाशांचे स्थलांतर करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शाळेतील निवारा केंद्रात स्थलांतरित केलेल्या कुटुंबांची मुख्यमंत्री शिंदे यांनी सोमवारी (५ ऑगस्ट) भेट घेतली. पूरग्रस्त भागाची पाहणी केली. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, महापालिका आयुक्त शेखर सिंह, भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी महापौर उषा ढोरे या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे यांनी पूरग्रस्तांशी संवाद साधला. दर वर्षी पावसाळ्यात घरात पाणी जाते का, किती लोकांचे स्थलांतर झाले, महापालिकेकडून जेवणासह सर्व सोयी-सुविधा मिळतात का, याची चौकशी केली. या संकटाचा सामना करण्यासाठी काय उपाययोजना केल्या पाहिजेत, तुमचे म्हणणे काय, अशी विचारणा केली. त्यावर काहींनी सीमाभिंत बांधण्याचे सुचविले, तर काहींनी पुनवर्सनाची मागणी केली. पूरपरिस्थितीमुळे दर वर्षी स्थलांतरित व्हावे लागत असलेल्या या संकटातून बाहेर काढण्यासाठी सुरक्षित जागेत कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याचा तोडगा काढण्याचे आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

### आरोग्य विभागाच्या कामाचा आढावा

मुख्यमंत्री शिंदे यांनी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्याशी चर्चा केली. कोणकोणत्या वैद्यकीय सुविधा दिल्या आहेत, औषधांची कमतरता आहे का, जलजन्य आजारांची परिस्थिती काय आहे, पूरग्रस्त भागातील रहिवाशांची वैद्यकीय तपासणी केली आहे का, याची माहिती घेतली.



### खड्डे बुजविण्यासाठी प्रशासनाची धावपळ

मुख्यमंत्री शिंदे यांच्या दौऱ्यापूर्वी सांगवीतील खड्डे बुजविण्यासाठी महापालिका प्रशासनाची धावपळ उडाली. मुख्यमंत्र्यांना खड्डे दिसू नयेत यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शाळा परिसरातील खड्डे दुरुस्त केले गेले.

## “एकनाथ काका आम्हाला प्लिज भिंत बांधून द्या”; चिमुकल्याची मुख्यमंत्र्यांना साद




मागील काही दिवसांपासून पुणे शहर आणि जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरू आहे. पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणात देखील पावसाने जोरदार हजेरी लावली असून सद्यस्थितीला खडकवासला धरण साखळी क्षेत्र ९२.५८ टक्के भरले आहे. तर २६.९१ टीएमसी इतका पाणीसाठा जमा झाला आहे. धरण क्षेत्रात जोरदार पाऊस होत आहे. त्या पार्श्वभूमीवर खडकवासला धरणामधून २५ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग नदी पात्रात सोडण्यात आला आहे. यामुळे सिंहगड रोड परिसरातील नदी काठच्या भागातील सोसायटींमधील घरात पाणी जाण्याच्या घटना घडल्या आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सिंहगड रोडवरील एकतानगरी मधील नागरिकांशी संवाद साधला. त्यावेळी एका चिमुकल्याने हातामध्ये ‘एकनाथ काका आम्हाला प्लीज भिंत बांधुन द्या!!!’ असा फलक हातात घेतला होता. हा फलक घेतलेला मुलगा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्या मुलाशी संवाद साधला. भिंत बांधण्यासाठी नक्कीच प्रयत्न करू, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चिमुकल्याला दिले. मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याला वाहतूक कोंडीची झळ बसू नये, याकरिता दुपारी बारा वाजल्यापासूनच सिंहगड रस्त्यावर संतोष हॉल चौकापर्यंत पोलीस कर्मचारी तैनात होते. संतोष हॉल चौकापासून सनसिटीकडे जाणारा रस्ता अतिशय अरुंद असल्याने या रस्त्यावर देखील ठिकठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात होते.

## मुख्यमंत्र्यांना वाहतूक कोंडीतून सोडवण्यासाठी पोलिसांची तारांबळ

सिंहगड रस्त्यावरील एकता नगरी, विठ्ठल नगर या भागातील पुरामुळे बाधित झालेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी पुणे दौऱ्यावर आले होते. सिंहगड रस्त्यावरून मुख्यमंत्र्यांचा ताफा एकतानगरीकडे जाणार असल्याने वाहतूक कोंडी होऊ नये, म्हणून सिंहगड रस्त्याला अक्षरशः पोलीस छावणीचे स्वरुप आले होते. प्रत्येक चौकात दहापेक्षा जास्त पोलीस कर्मचारी तैनात ठेवण्यात आले होते. रस्त्यावर उभ्या असलेल्या दुचाकी, चारचाकी हटविण्यात येत होत्या. जी वाहने हटविली गेली नाहीत, त्यांना टोईंग करून बाजूला करण्यात येत होते. मुख्यमंत्री कुठवर आले, याची जसजशी माहिती मिळत होती, तसतशी धायरीकडून राजाराम पुलाकडे जाणारी वाहतूक रोखून धरण्यात येत होती. मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याला वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये, म्हणून पुणे पोलिसांची तारांबळ उडाल्याचे चित्र दुपारच्या सुमारास होते. पिंपरी-चिंचवड शहरातील सांगवी, त्यानंतर शिवाजीनगर येथील पाटील इस्टेट आणि त्यानंतर सिंहगड रस्त्यावरील एकता नगरी या भागातील पुरामुळे बाधित झालेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी, त्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री शिंदे पुणे दौऱ्यावर आले होते. सांगवी, पाटील इस्टेट येथील नागरिकांना भेटल्यानंतर मुख्यमंत्र्यांचा ताफा शिवाजीनगर येथून सिंहगड रस्त्याकडे मार्गस्थ झाला. त्यामुळे दांडेकर पुलापासून संतोष हॉल चौकापर्यंत चौकाचौकात दहापेक्षा जास्त पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. खासकरून राजाराम पुलापासून संतोष हॉल चौकापर्यंत उड्डाणपुलाच्या कामामुळे दररोज प्रचंड वाहतूक कोंडी होते. दुपारी सव्वातीनच्या सुमारास मुख्यमंत्री शिंदे यांचा ताफा रांका ज्वेलर्सच्या चौकातून पुढे मार्गस्थ झाला.

# पावसामुळे पुण्यात शहरभर खड्डे

## कोंडी टाळण्यासाठी 30 चौकांत जड वाहनांना बंदी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसामुळे शहरातील बहुतांश प्रमुख चौकांत खड्डे पडले आहेत. खड्ड्यांमुळे वाहतुकीचा वेग संथ झाला असून, कोंडी सोडविण्यासाठी शहरातील प्रमुख ३० चौक सकाळी नऊ ते रात्री दहा यावेळेत जड वाहनांना बंद करण्यात येणार आहेत. १२ ऑगस्टपर्यंत हे आदेश लागू राहणार आहेत.**



प्रमुख चौक जड वाहनांसाठी (डंपर, ट्रक, सिमेंट मिक्सर, तसेच अन्य जड वाहन) बंद करण्यात आले आहेत. मात्र, अत्यावश्यक सेवेतील वाहनांना या आदेशातून वगळण्यात आले आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी दिली. शहरात गेल्या काही दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. संततधार पावसामुळे बहुतांश रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. खड्ड्यांत पाणी साचल्यामुळे वाहतुकीचा वेग संथ झाला आहे. त्यामुळे चौकाचौकात कोंडी होत असल्याचे दिसून आले आहे. शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रमुख ३० चौकात जड वाहनांना १२ ऑगस्टपर्यंत बंदी घालण्यात आली आहे. सकाळी नऊ ते रात्री दहा यावेळेत जड वाहनांना मनाई करण्यात आली आहे. जड वाहनांना बंदी घालण्याचे आदेश तात्पुरते आहेत, असे पोलीस उपायुक्त पवार यांनी सांगितले. १२ ऑगस्टपर्यंत सकाळी नऊ ते रात्री दहा यावेळेत जड वाहनांना बंदी घालण्यात आलेले प्रमुख चौक पुढीलप्रमाणे : संचेती चौक, पौड फाटा चौक, राजाराम पूल, दांडेकर पूल चौक, नीलायम पूल (ना. सी. फडके चौकाकडे), सावरकर पुतळा चौक (बाजीराव रस्त्याकडे), लक्ष्मीनारायण चित्रपटगृह चौक (जेधे चौकाकडे), पंडोल अपार्टमेंट चौक (महात्मा गांधी रस्त्याकडे), खान्या मारुती चौक (इस्ट स्ट्रीटकडे), पॉवर हाऊस चौक (मालधक्का चौकाकडे), आरटीओ चौक (शाहीर अमर शेख चौकाकडे), पाटील इस्टेट चौक (आरटीओ चौकाकडे), ब्रेमेन चौक (विद्यापीठ चौकाकडे), शास्त्रीनगर चौक (येरवडा गुंजन चौकाकडे), आंबेडकर चौक (सादलबाबा चौकाकडे), मुंढवा चौक (ताडीगुत्ता चौकाकडे), चंद्रमा चौक (सादलबाबा चौकाकडे), नोबल चौक (भैरोबानाला चौकाकडे), लुल्लानगर चौक (भैरोबानाला चौकाकडे), लुल्लानगर चौक (गोळीबार मैदान चौकाकडे), लुल्लानगर चौक (गंगाधाम चौकाकडे), बिबवेवाडी पुष्पमंगल चौक (जेधे चौकाकडे). राजस सोसायटी (बिबवेवाडी महेश सोसायटी चौकाकडे), मुंबई-पुणे रस्ता पोल्ट्री चौक (आरटीओ चौकाकडे), उंड्री (एनआयबीएम चौकाकडे), पिसोळी (हडपसरकडे), हांडेवाडी (हडपसरकडे), अभिमानश्री चौक, बाणेर रस्ता (विद्यापीठ चौकाकडे), अभिमानश्री चौक, पाषाण रस्ता (विद्यापीठाकडे)प्रमुख चौक जड वाहनांसाठी (डंपर, ट्रक, सिमेंट मिक्सर, तसेच अन्य जड वाहने) बंद करण्यात आले आहेत. मात्र, अत्यावश्यक सेवेतील वाहनांना या आदेशातून वगळण्यात आले आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी दिली. शहरात गेल्या काही दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. संततधार पावसामुळे बहुतांश रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. खड्ड्यांत पाणी साचल्यामुळे वाहतुकीचा वेग संथ झाला आहे.

### सकाळी नऊ ते रात्री दहा यावेळेत बंद

शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रमुख ३० चौकात जड वाहनांना १२ ऑगस्टपर्यंत बंदी घालण्यात आली आहे. सकाळी नऊ ते रात्री दहा यावेळेत जड वाहनांना मनाई करण्यात आली आहे. जड वाहनांना बंदी घालण्याचे आदेश तात्पुरते आहेत, असे पोलीस उपायुक्त पवार यांनी सांगितले.पावसामुळे शहरातील बहुतांश प्रमुख चौकांत खड्डे पडले आहेत. खड्ड्यांमुळे वाहतुकीचा वेग संथ झाला असून, कोंडी सोडविण्यासाठी शहरातील प्रमुख ३० चौक सकाळी नऊ ते रात्री दहा यावेळेत जड वाहनांना बंद करण्यात येणार आहेत.

# आदिवासी पाड्यावरील चिमुरड्यांसाठी ‘ससून’ बनले ‘माय’!

## रुग्णवाहिकेतून कर्मचाऱ्यांनी कुटुंबाला सुखरूप सोडले घरी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कामशेतमधील राऊतवाडी येथील आदिवासी पाड्यावरील गर्भवती आणि तिची दोन मुले दूषित पाण्यामुळे गंभीररित्या आजारी पडली. अतिसारामुळे त्यांची प्रकृती खालावली. त्यामुळे त्यांना ससून सर्वोपचार रुग्णालयात हलविण्यात आले.**




रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी महिलेवर उपचार करीत असतानाच तिच्या दोन मुलांवर स्वतंत्रपणे उपचार केले. या कालावधीत कर्मचारीच या मुलांची पालकांप्रमाणे काळजी घेत होते. राऊतवाडी येथील आदिवासी पाड्यावर दूषित पाण्यामुळे एकाच कुटुंबातील तिघे आजारी पडले. त्यात सात महिन्यांची गर्भवती आणि तिचा २ वर्षांचा मुलगा आणि ७ वर्षांची मुलगी यांचा समावेश होते. अतिसारामुळे त्यांची प्रकृती खालावली होती. या तिघांचे कुपोषण होऊन त्यांच्या मूत्रपिंडाचा त्रासही सुरू झाला होता. रुग्णवाहिकेतून या तिघांना ससून रुग्णालयात २ जुलैला दाखल करण्यात आले. या महिलेला स्त्रीरोग विभागात तर मुलांना बालरोग विभागात दाखल डॉकरण्यात आले. रुग्णालयात संबंधित महिलेची तपासणी केली त्यावेळी तिच्या गर्भाचा पोटातच मृत्यू झाल्याची बाब निष्पन्न झाली. तिला याची माहिती नव्हती. गर्भाचा मृत्यू झाल्याने महिलेची प्रकृती गंभीर बनली होती. स्त्रीरोग विभागाचे प्रमुख डॉ. संजयकुमार तांबे यांच्या नेतृत्वाखाली उपचार सुरू करण्यात आले.

### डॉ. साळवी यांनी उपचार केले

महिलेची क्रिएटिनिन पातळी वाढली होती. डॉक्टरांनी तिची प्रकृती स्थिर केली.याचवेळी दोन मुलांवर बालरोग विभागाच्या प्रमुख डॉ. आरती किणीकर यांच्या नेतृत्वाखाली उपचार सुरू होते. या मुलांना दोन दिवस अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले. मुलांची आई स्त्रीरोग विभागात उपचार घेत असल्याने त्यांचे वडील तिथे थांबले होते. या कालावधीत बालरोग विभागातील कर्मचाऱ्यांनी या मुलांची काळजी घेतली. त्यांना मानसिक आधार देण्यासोबत त्यांची सेवा केली. महिलेची प्रकृती थोडी बरी होताच तिघांना औषधशास्त्र विभागात हलविण्यात आले. तिथे डॉ. सोनाली साळवी यांनी त्यांच्यावर उपचार केले. त्यांची प्रकृती सुधारल्यानंतर १६ जुलैला रुग्णालयातून सोडण्यात आले.

# रुपीनगरमधील रुपी हौसिंग सोसायटीचा 'अंधकार संपला'

## मुख्य वीजवाहिनी नवीन टाकण्याचे काम सुरु; आ. महेश लांडगे यांचा पुढाकार

। पिंपरी।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवडसह मावळ परिसरात झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे रुपीनगर येथभल रुपी हौसिंग सोसायटी व परिसरात गेल्या ८ दिवसांपासून वीज नाही. मात्र, आता स्थानिक नागरिक व सोसायटीधारकांना सहन करावा लागणारा 'अंधकार संपला' आहे. या भागात महावितरण प्रशासनाकडून नवीन मुख्य वीजवाहिनी टाकण्याचे काम सुरू झाले आहे.**

रुपीनगर येथील रुपी हौसिंग सोसायटीमध्ये मुख्य वीजवाहिनी खराब झाली होती. त्यामुळे गेल्या ८ दिवसांपासून वीजपुरवठा खंडीत झाला होता. दरम्यान, महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करुन केबलला तात्पुरता जॉईंट करण्यात आला. मात्र, वीज समस्या पुन्हा उद्भवली होती.

दरम्यान, माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांच्या पुढाकाराने स्थानिक नागरिकांनी सदर समस्या भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या कानावर घातली. आमदार लांडगे यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता अतूल देवकर यांच्याशी संवाद साधला आणि नवीन वीज वाहिनी टाकण्याबाबत सूचना केली. त्याची तातडीने दखल घेण्यात आली आणि आज ३१० मीटर अंतरावरील वीज वाहिनी टाकण्याचे काम सुरू झाले. विशेष म्हणजे, आमदार महेश लांडगे यांनी सदर काम स्वनिधीतून केले आहे.

यावेळी माजी नगरसेवक शांताराम भालेकर, कार्यकर्त्या अस्मिता भालेकर, रविंद्र काळे, गणेश मगर, शिवाजी बोडके, विशाल खाणेकर, प्रशांत हिवाळे, सुनिल समगीर, अरुण पाटील, साहेबराव मळेकर, किरण पाटील, रविराज शेतसंधी, अनिल भालेकर, रमेश भालेकर, संदीप जाधव, शिरीश उत्तेकर यांच्यासह सोसायटीमधील रहिवाशी सुमन काकडे, शीतल पारखी, केणेकर, स्वाती कासार आदी उपस्थित होते.



### रहिवाशांनी मानले आमदार महेश लांडगे यांचे आभार....

दरम्यान, अतिमुसळधार पावसामुळे रुपीनगर, तळवडे परिसरातील सखल भागामध्ये पाणी साचले. आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेप्रमाणे स्थानिक पातळीवर माजी नगरसेवक शांताराम भालेकर आणि सहकाऱ्यांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. नैसर्गिक आपत्तीच्या काळात आमदार लांडगे यांचे बंधू कार्तिक लांडगे यांनी परिसरात पाहणी केली. स्ट्रॉम वॉटर लाईन, ड्रेनेज लाईन, रस्त्याची दुरुस्ती अशी कामे हाती घेण्यात आली. तसेच, नागरिक, गृहिणी-विद्यार्थी आणि व्यापारी-उद्योजकांना भेडसावणारी वीज समस्या निकालात काढण्यासाठी मुख्य वीजवाहिनी नवीन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि सोसायटीधारकांनी आमदार महेश लांडगे यांचे आभार मानले आहेत.

# काँग्रेस संघटनेचे तळागाळापर्यंत काम!

## नाना पटोलेः शहर काँग्रेसच्या उपक्रमाची व कार्यक्रमाचा घेतला आढावा

। पिंपरी ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रांताध्यक्ष नाना पटोले हे कामगार संघटनेच्या आक्रोश मेळाव्यास आले असता त्यांनी पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या खराळवाडी, पिंपरी येथील मध्यवर्ती कार्यालयास भेट दिली. शहर काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भेट घेऊन शहर काँग्रेसच्या विविध उपक्रमाची व कार्यक्रमाची सविस्तर माहिती घेतली.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्रभाग रचना, तिन्ही विधानसभा निहाय बूथ कमिटी बनविणे बाबतची माहिती व शहरातील प्रमुख नागरी समस्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी पिंपरी चिंचवड शहर काँग्रेस कमिटीचा संघटनात्मक कामाचा आढावा घेतला, तसेच शहर काँग्रेस कमिटीतर्फे राबवल्या जाणाऱ्या 'काँग्रेस पक्ष करदात्या नागरिकांच्या दारी' डिजिटल प्रचार वाहनांचा शुभारंभ करण्यात आला. शहर काँग्रेसने गेले तीन वर्ष राबविलेली उपक्रम, कार्यक्रम, आंदोलने तसेच संघटनेचे काम बघता, प्रांताध्यक्ष पटोले यांनी तळागाळापर्यंत काँग्रेस पक्ष काम करीत असल्याचे समाधान व्यक्त केले तसेच होऊ घातलेल्या विधानसभा व महानगरपालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेवून सर्व कार्यकर्त्यांनी कामास लागावे अशी सूचना केली.

या प्रंसगी शहराध्यक्ष डॉ, कैलास कदम, राष्ट्रीय सेवादल सचिव संग्राम तावडे, माजी महिला कॉंगेस प्रदेशाध्यक्षा श्रीमती श्यामला सोनवणे, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब मुगुटमल, राजाराम भोंडवे, संदेश नवले, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस पर्यावरण विभाग सरचिटणीस अमर नाणेकर, माजी एनएसयूआय प्रदेशाध्यक्ष मनोज कांबळे, प्रदेश कॉंग्रेस सामाजिक न्याय विभाग उपाध्यक्ष वाहब शेख, वरिष्ठ उपाध्यक्ष मयूर जयस्वाल, अॅड. अनिरुध्द कांबळे, भरत वाल्हेकर, पिंपरी ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगताप, भोसरी ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे, प्रदेश युवक काँग्रेस सचिव व राष्ट्रीय प्रवक्ते गौरव चौधरी, सेवादल अध्यक्ष प्रा. किरण खाजेकर, प्रोफेशनल कॉंग्रेस अध्यक्ष दाहर मुजावर, झोपडपट्टी सेल अध्यक्ष प्रा, बी, बी. कांबळे, डॉक्टर सेल अध्यक्षा मनिषा गरुड, महाराष्ट्र व्यापारी सेलचे अमरजीतसिंग पाथीवाल, शहर उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, मेहबूब शेख, अर्चना राऊत, स्मिता पवार-मुलाणी, महेश पाटील, गणेश गरड शहर सरचिटणीस मून्साफअली खान, निखिल भोईर, सतीश भोसले, वसंत वावरे, रवींद्र कांबळे, सचिन गायकवाड, शहर सचिव अॅड. मोहन अडसूळ, गौतम ओव्हाळ, अॅड. अनिकेत रसाळ, आकाश शिंदे, योगेश बहिरट, युनूस बागवान, पिंपरी ब्लॉक उपाध्यक्षा ज्योती गायकवाड, अरुणा वानखेडे, निर्मला खैरे, शहाबुद्दीन शेख, मकरध्वज यादव, विशाल कसबे, फिरोज तांबोळी, कुंदन कसबे, तुषार पाटील, आवेज सय्यद, राजन नायर, सुनील राऊत, बाबा वाघमारे, विकास कांबळे, इरफान शेख, आदींसह या बैठकीस शहर काँग्रेस मधील आजी-माजी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पिंपरी- चिंचवड शहरातील पूर परिस्थिती; पार्थ पवारांनी घेतला आढावा



। पिंपरी ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

पिंपरी-चिंचवड शहरातील पूरस्थितीचा अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांनी आढावा घेतला. गेल्या काही तासांपासून पिंपरी-चिंचवड सह घाटमाथ्यावर जोरदार पाऊस कोसळत आहे. यामुळे पिंपरी- चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना नदीला पूर आलेला आहे. नदीचे पाणी अनेकांच्या घरात शिरलं आहे. या कुटुंबाशी पार्थ पवार यांनी संवाद साधला. त्यांची विचारपूस केली.

पिंपरी- चिंचवड सह लोणावळा आणि मावळ परिसरात आज सकाळपासूनच मुसळधार पाऊस झाला आहे. पवना धरणातून आठ हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. त्यामुळेच पिंपरी- चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना नदीला पूरस्थिती निर्माण झाली आहे. पवना नदी दुथडी भरून वाहत आहे.

नदी काठच्या घरात पाणी शिरल आहे. याचाच आढावा आज अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांनी घेतला आहे. यावेळी त्यांच्यासोबत आमदार अण्णा बनसोडे आणि कार्यकर्ते होते. मात्र, पिंपरी- चिंचवड शहरात पार्थ पवार यांनी लक्ष दिल्याने आणि पूरग्रस्तांची पाहणी केल्याने अनेक चर्चेला उधाण आल आहे.

# “पावसाक्षरांच्या नोंदी - मनाच्या अंतरी”....



## भूमिका

**वैशाखाच्या वणव्यात होणारी जीवाची काहिली सहन करता करता काळजी लागते की ज्येष्ठ कधी येईल , कारण ज्येष्ठ आला की सोबतीला तो मस्तपैकी मेघांना घेऊन येतो , आसमंतात छानपैकी मेघांची दाटी होते आणि मळभ जमा होते ,,,, मग कुठे थोडंफार जीवाची काहिली कमी होते .... आणि आषाढाच्या चाहुलीने तर मन प्रसन्न होते ,,,,**

मनाचा फुल्लोर फुलायला आतुर होतो , आषाढाच्या सरी बरसायला लागल्या की , मातीचा दरवळणारा मंदधुंद करणारा सुगंध आपल्याला आला की रंध्रारंध्रातून आपल्या तनमनाला वेगळ्याच आनंदात घेऊन जातो ....

तो आनंद म्हणजे स्वर्गीय आनंदच ,,,, अवर्णनीय ....



खरंच वैशाखातील जीवाची लाहीलाही कुठे आणि हा आनंद कुठे .... ज्येष्ठ , आषाढ , श्रावण असो की भाद्रपद हा काळ म्हणजे सृजनाचाचं काळ होय ..... कारण हा ऋतू मनातील दु:ख दूर करून मन आनंदित करतो.ह्यावेळीच सर्व धरित्रीही हिरवागार शालू नेसून मिरवत असते .... शेती , माती ही भूईचं नव्हे या धरतीवरील प्रत्येक प्राणिमात्र हा तृप्ततेची अनुभूती घेत असतो .... परंतु काळाच्या ओघात होणाऱ्या परिवर्तनात आपणही बदलत चाललोय .... म्हटल्यापेक्षा आपण तर काळाच्या दोन पावलं पुढे जाऊन आपल्यात आमूलाग्र बदल आणलाय .... आता हेच बघा नां ....काल म्हणजे आपल्या लहानपणी .... लहानपणी कशाला चांगलं वयाच्या तिशीपर्यंत आम्ही पण पावसात जमलेल्या छोट्या छोट्या डबक्यात छप्पाक म्हणून उड्या मारायचो ....

त्यावेळी आपल्याला रोक टोक करायला कुणी नसायचं आणि त्या उड्या मारण्याला कुणी बघायचं पण नाही ,,,, लहानपणी आई बाबा किंवा घरचे ज्येष्ठ मंडळी पण काही म्हणायची नाहीत .... पण आज आपण समजदार झालोत आणि अचानकपणे त्या पावसाच्या साचलेल्या किंवा रस्त्यावरील वाहणाऱ्या पाण्याचा छप्पाक म्हणून उड्या मारण्याचा आनंद घ्यायच्या ऐवजी त्यामध्ये जिवाणू बघायला लागलो , नको रे बाबा ते रस्त्यावरील पाणी , त्यातील जीव , जंतू ,,,, मी जर आजारी पडलो तर .... आणि मी आजारी पडलो तर माझं ऑफिसला सुट्टी पडण्याची भीती मनाला आणखी भिवविते ,,,, हाच पठ्या लहानपणी देवाला प्रार्थना करायचा की ...., हे देवा , खूप खूप पाऊस पडू दे , शाळे मस्त सुट्टी मिळू दे .... खरंच , ये कहा आ गये हम ,युं ही जिंदगी मे चलते चलते पाऊस तेव्हाही असाच पडत असायचा आणि आताही पाऊस तेव्हाच्या सारखाचं पडतोय ,,,, पाऊस तोच आहे , डबकीही तशीच साचतात , ज्या डबक्यात आपण कागदाची नाव बनवून टाकायचो , छप्पाक म्हणून उड्या मारायचो पाऊस अजूनही पाऊसच आहे , बदललोय आपणच , आपण आपला काळ विसरलोय , कागदाच्या मागे धावता धावता आपणच कागद बनलोय ....

कागदाच्या कृत्रिम आनंदात आपण खराखुरा बिनापैशाने मिळणारा आनंद घ्यायला विसरलोय .... बदलत्या काळात माणसानेही स्वतः मध्ये बदल आणावा किंवा त्यानुसार माणसानं बदलावं असं म्हणतात. पण हे बदलणं जर त्याचं मुळ अस्तित्वच हिरावून नेत असेल. तर ह्याला बदल नाही तर गुलामगिरीच म्हणावी लागेल....माणसानं स्वतःमध्ये बदल आणला , काळानुसार बदलला आणि त्याच्या ह्या बदलासोबतचं त्याचं चांदण्यांनी भरलेलं आकाश ही आपसूकच सुटलं . तो आता कर्जाच्या हफ्त्याने आच्छादित असलेल्या सिमेंटच्या छताखाली चार भिंतींमध्ये थकलेला जीव जेव्हा देह टाकतो , तेव्हा झोपतांना तो त्याच्या अपूर्ण इच्छा, त्याचं स्वतःच अपयश आणि दुसऱ्याच्या यशाची असुया छातीवर घेऊन झोपत असतो .झोपतो कसला तो ? तो विव्हळत असतो . अन ते ही आतल्या आत. तो दिलखुलास रडणं आणि मनमुराद हसणं विसरला आहे . बिनधास्तपणे जगणं , छप्पाकपणे पावसात उड्या मारणं , धिंछाकपणा सगळं सगळं विसरलायं .... त्याचं शरीर जरी जगाच्या रहाटगाडग्यात - स्पर्धेत धावत असलं तरी . मन मात्र विषण्ण झालंय .... ही विषण्णता त्याला आतल्या आत पोखरत असते मगरीसारखी ,,,, कुरतडत असते क्षणाक्षणाला .... माणूस दिवसेंदिवस एक प्रकारच्या क्लिष्टतेत अडकत चाललायं .... आपण जर इतिहास चाळून पाहिला तर आपल्याला अनुभूती होईल की , जे काही नैसर्गिक आणि उपजत आहे.

## प्रासंगिक »

# केवळ आकर्षण

***चंड प्रमाणात वाढली आहे, परिणामी, वाघांना एकांतवास शोधण्यासाठी आपली पारंपारिक रहिवासाची क्षेत्रे सोडावी लागत आहेत.***

परिणामी, वाघांना एकांतवास शोधण्यासाठी आपली पारंपारिक रहिवासाची क्षेत्रे सोडावी लागत आहेत. त्यामुळे ते चुकून मानवी वस्तीत शिरताना आढळत आहेत. एकीकडे रूबाबदार पट्टेरी वाघांची सर्वाधिक संख्या आपल्या देशात आहे याचा सार्थ अभिमान आपल्याला वाटत असला आणि दुसरीकडे जागतिक पातळीवर वाघांची संख्या दुप्पट करण्याचा निर्णय जरी घेण्यात आला असला तरी प्रत्यक्षात मात्र वाघांची संख्या मोठ्या संख्येने घटत असून, वाघ केवळ पर्यटकांना आकर्षित करण्याचे साधन ठरला आहे का, असा गंभीर परंतु रास्त प्रश्न उपस्थित झाला आहे. वाघ हा अन्नसाखळीतील सर्वोच्च घटक आहे. वाघांच्या संख्येवरच एकंदरीत प्राणिविश्वाची संपन्नता आहे. वाघाच्या ‘बाली टायगर, कॅस्पियन टायगर, जावा टायगर, सैबेरियन टायगर, इंडोचायनीच टायगर, मलाया टायगर, चिनी टायगर, सुमात्रा टायगर, बंगाल टायगर अशा नऊ प्रजाती आहेत.

श्रावण महिना हा अत्यंत पवित्र महिना मानला जातो. या महिन्यात शिवची आराधना केली जाते. या महिन्यात उपवासाला विशेष महत्त्व आहे. श्रावण महिन्यात उपवास केल्याने शिवाची कृपा प्राप्त होते, अशी मान्यता आहे. श्रावण महिन्यात सोमवारचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

# श्रावण मास, श्रावणी सोमवार आणि शिवामूठ

श्रावण महिन्यात शिवभक्त दर सोमवारी उपवास करतात व शिवमूठ वाहतात पण तुम्हाला माहिती आहे का, यंदा श्रावण महिना केव्हापासून सुरू होतोय? श्रावण महिन्यात किती श्रावण सोमवार आहेत? आणि प्रत्येक सोमवारी कोणती शिवमूठ वाहावी? आज आपण त्याविषयी सविस्तर जाणून घेणार आहोत. पंडित उदय मोरोणे सांगतात, “यंदा श्रावण महिना हा ५ ऑगस्ट २०२४ सुरू होतोय व २ सप्टेंबर रोजी श्रावण समाप्त होणार आहे. यंदाच्या श्रावण महिन्याचे वैशिष्ट्य म्हणजे श्रावण महिना हा सोमवार पासूनच होत आहे. या महिन्यात पाच श्रावण सोमवार आले आहेत. या महिन्यात शिवाचा महारुद्रभिषेक करावा. नियमित व्रत करावे. शिवाचा अभिषेक करत १०८ वेळा रोज बेल वाहावे.” पंडित उदय मोरोणे पुढे सांगतात, “खाली सांगितल्याप्रमाणे दर सोमवारी शिवमुठ वाहावी.”पहिल्या सोमवारी शिवमूठ तांदूळ वाहावे.दुसऱ्या सोमवारी शिवमूठ तीळ वाहावे. तिसऱ्या सोमवारी शिवमूठ मूग वाहावे. चौथ्या सोमवारी शिवमूठ जव वाहावे. पाचव्या



सोमवारी शिवमूठ हरभरा वाहावे.” लग्नानंतर श्रावण महिन्यात पहिले पाच वर्षे मंगळागौरीचे पूजन करावे. श्रावण महिन्यात श्री शिवलिलामृत अकरावा अध्याय रोज वाचावा. जर शक्य नसेल कर तुम्ही दर सोमवारी सुद्धा हा अध्याय वाचू शकता.” हिंदू धर्म शास्त्रानुसार चातुर्मास प्रारंभ झाल्यावर (म्हणजेच आषाढ शुद्ध एकादशीनंतर) येणारा पहिला मास हा श्रावण मास होय. रूढी परंपरेनुसार या मासापासून व्रत वैकल्ये सुरू होतात. या मासाला पवित्र मास म्हणतात, अशी माहिती सनातन संस्थेच्या विभा चौधरी यांनी दिली

१. पवित्र मासात श्रावणी सोमवार, नागपंचमी, मंगळागौर पूजन, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, शुक्रवारचे व्रत अशी अनेक व्रते केली जातात. या महिन्यातील प्रत्येक सोमवारी ‘श्रावणी सोमवार’ हे व्रत केले जाते.

२. या वर्षीच्या श्रावण महिन्यामध्ये श्रावण सोमवारचे व्रत ५, १२, १९, २६ ऑगस्ट आणि २ सप्टेंबर या दिवशी असणार आहे. या महिन्यातील प्रत्येक श्रावण सोमवारी हे व्रत करावे.

३. श्रावण मासातील सोमवारी शिवाच्या मंदिरात जाऊन शिवपिंडीला अभिषेक घालणे, पूजा करणे, शिवामूठ वाहणे अशा प्रकारे हे व्रत केले जाते. सोमवार व्यतिरिक्त अन्य व्रते धर्मने सांगितल्या प्रमाणे आणि रूढी परंपरेनुसार सुरू असतात. या पवित्र श्रावण महिन्यातील व्रते भक्ती भावाने केली जातात.

४. श्रावण महिन्यातील दर सोमवारी शंकराच्या देवळात जाऊन त्याची पूजा आणि निराहार उपवास किंवा नक्त व्रत करण्याची प्रथा आहे. श्रावण सोमवारी उपवास करून शिवाची विधिवत पूजा करण्याचे महत्व ग्रंथ व्रत राजमधील श्लोकातून दिले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पाच वर्षानंतर पक्ष झोपेतून उठला!

## आदित्य ठाकरेंची राज ठाकरेंवर खोचक टीका

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांवर येऊन ठेपली आहे. या निवडणुकीच्या आधी सर्वच राजकीय पक्षांनी आतापासून जोरदार तयारी सुरू केली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने पदाधिकाऱ्यांच्या बैठका, मेळावे, सभा, मतदारसंघांचे दौरे अशा प्रकारचं काम राजकीय नेत्यांकडून सुरु असल्याचं चित्र सध्या पाहायला मिळत आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या या दौऱ्यावरून शिवसेना ठाकरे गटाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांनी हल्लाबोल केला आहे. “पाच वर्षानंतर पक्ष झोपेतून उठला आहे. ते निवडणुकीच्या काळात जागे होतात”, अशी खोचक आदित्य ठाकरे यांनी मनसेवर केली.

पाच वर्षानंतर पक्ष झोपेतून उठलेला आहे. ते निवडणुकीच्या काळात जागे होतात. मग महाराष्ट्र पिंजून काढणार, असे त्यांचे दौरे चालतात. सुपारीबाज पक्ष आहे ते त्यांचं काम करतील. आम्ही आमचं जनतेच्या सेवेचं काम करत आहोत. गेल्या पाच वर्षांच्या काळात मग त्यामध्ये कोवीडच्या काळात किंवा मुंबईत इतर काही घटना घडत असताना हा पक्ष दिसला तरी का? त्यामुळे आम्ही त्यांच्याकडे जास्त लक्ष देत नाहीत. सुपारीबाज पक्ष आहे तो तिथेच राहिल”, असा हल्लाबोल आदित्य ठाकरेंनी मनसेवर केला. विधानसभेच्या निवडणुकीत वरळी मतदारसंघामधून शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्या विरोधात मनसे नेते संदिप देशपांडे यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. यावर बोलताना आदित्य ठाकरे यांनी खोचक टोला लगावला. “मला वाटलं बायडन येत आहेत”, असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा अद्याप झालेली नाही. मात्र, तरी सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. त्यानुसार मनसे अध्यक्ष राज ठाकरे सुद्धा ॲक्शन मोडमध्ये आहेत. राज ठाकरे हे सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. ते आज सोलापूरमध्ये होते. आज सोलापूरमध्ये असताना त्यांनी विधानसभा निवडणुकीसाठी दोन उमेदवारांची घोषणा केली आहे. शिवडी आणि पंढरपूर या दोन मतदारसंघांसाठी उमेदवारांची घोषणा केली. शिवडी मतदारसंघातून मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. तर पंढरपूर मतदारसंघातून दिलीप धोत्रे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.राज ठाकरे हे सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर असून ते राज्यातील विविध मतदारसंघांचा आढावा घेत आहेत. काही दिवसांपूर्वीच राज ठाकरे यांनी आगामी विधानसभा निवडणुकीत २२५ ते २५० जागा लढवणार असल्याची घोषणा केली होती. त्यानंतर आता सध्या राज ठाकरेंकडून या जागांसाठी उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. त्यापैकी दोन ठिकाणी उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. पाच वर्षानंतर पक्ष झोपेतून उठलेला आहे. ते निवडणुकीच्या काळात जागे होतात. मग महाराष्ट्र पिंजून काढणार, असे त्यांचे दौरे चालतात. सुपारीबाज पक्ष आहे ते त्यांचं काम करतील. आम्ही आमचं जनतेच्या सेवेचं काम करत आहोत. गेल्या पाच वर्षांच्या काळात मग त्यामध्ये कोवीडच्या काळात किंवा मुंबईत इतर काही घटना घडत असताना हा पक्ष दिसला तरी का? त्यामुळे आम्ही त्यांच्याकडे जास्त लक्ष देत नाहीत. सुपारीबाज पक्ष आहे तो तिथेच राहिल”, असा हल्लाबोल आदित्य ठाकरेंनी मनसेवर केला. विधानसभेच्या निवडणुकीत वरळी मतदारसंघामधून शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्या विरोधात मनसे नेते संदिप देशपांडे यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. यावर बोलताना आदित्य ठाकरे यांनी खोचक टोला लगावला. “मला वाटलं बायडन येत आहेत”, असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा अद्याप झालेली नाही. मात्र, तरी सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत.

### राज ठाकरे सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर

राज ठाकरे सुद्धा ॲक्शन मोडमध्ये आहेत. राज ठाकरे हे सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. ते आज सोलापूरमध्ये होते. आज सोलापूरमध्ये असताना त्यांनी विधानसभा निवडणुकीसाठी दोन उमेदवारांची घोषणा केली आहे. शिवडी आणि पंढरपूर या दोन मतदारसंघांसाठी उमेदवारांची घोषणा केली. शिवडी मतदारसंघातून मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. तर पंढरपूर मतदारसंघातून दिलीप धोत्रे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.


# पुतण्याला वारस घोषित करुन मी थांबलो

## जयसिंह सोळंके हेच माझे राजकीय वारसदार : प्रकाश सोळंके

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

महाराष्ट्राच्या राजकारणात काका-पुतण्यांचं राजकारण आपण कायमच पाहिलं आहे. त्यातलं नुकतंच समोर आलेलं उदाहरण म्हणजे शरद पवार आणि अजित पवार. शरद पवारांनी पक्षाच्या चाव्या त्यांच्याकडेच ठेवल्याने अजित पवार नाराज झाले. २ जुलै २०२३ ला त्यांनी काका शरद पवार यांच्याविरोधात बंड करत थेट सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर काय काय घडामोडी घडल्या ते महाराष्ट्राने पाहिलं आहे.

आता अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदाराने शरद पवारांवर टीका केली आहे. शरद पवारांनी जर वेळीच अजित पवारांकडे पक्ष सोपवला असता तर त्यांचं घर फुटलं नसतं असं त्यांनी म्हटलं आहे.**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी थेट शरद पवारांबाबत भाष्य केलं आहे. प्रकाश सोळंकेहे चार ते पाच दशकांपासून राजकारणात आहेत. प्रकाश सोळंकेयांनी राजकीय निवृत्ती जाहीर केली.** त्यानंतर त्यांनी त्यांचे पुतणे जयसिंह सोळंके हेच माझे राजकीय वारसदार असतील असं म्हटलं आहे. या घोषणेनंतर त्यांनी शरद पवारांवर टीका केली.“मी




पाच वर्षापूर्वीच हे जाहीर केलं होतं की माझा राजकीय वारसा जयसिंह साळुंके पुढे चालवतील. राजकारण मोठ्या माणसाने कुठे थांबायचं हे ठरवलं पाहिजे. शरद पवार हे पण जर वेळीच थांबले असते तर त्यांचं घर फुटलं नसतं. त्यांच्या घरात जे घडलं ते घडलं नसतं. यावेळी लोकसभा निवडणुकीत जे घडलं ते मी आयुष्यात पाहिलं नव्हतं. मला दोन मुलं आहेत, एक मुलगी आहे. मात्र त्यांना राजकारणात रस नाही. राजकीय वारस म्हणून माझा चॉईस माझा पुतण्या जयसिंह हाच होता. त्यामुळे मी त्याचं नाव जाहीर केलं.” असं प्रकाश सोळंके म्हणाले. आज त्यांनी ही घोषणा केल्यानंतर एबीपी माझाशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी शरद पवारांवर टीका केली आहे.

### सोळंके हे नेमके कोण आहेत?

माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांचे लहान बंधू धैर्यशील सोळंके यांचे जयसिंह सोळंके हे चिरंजीव आहेत. म्हणजेच, प्रकाश सोळंके यांचे पुतणे. जयसिंह सोळंके धारूर पंचायत समितीचे उपसभापती राहिलेले आहेत. त्यासोबतच बीड जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिलेलं आहे. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेस युवकचे जिल्हाध्यक्ष म्हणून जयसिंह सोळंके यांनी यापूर्वी काम पाहिलं होतं. आता जयसिंह सोळंके हेच प्रकाश सोळंके यांचे वारसदार म्हणून आगामी विधानसभा निवडणूक लढण्याची शक्यता आहे.

# पंतप्रधान शेख हसीना यांचा राजीनामा!

## सरकारी नोकऱ्यांमधील कोट्याविरोधात प्रचंड आंदोलन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज





**बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी अखेर पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला. त्यांनी लष्करी हेलिकॉप्टरमधून देश सोडला आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, हसीना यांनी राजीनामा दिला असून, महिनाभरापासून आरक्षणावरून सुरू असलेल्या गदारोळानंतर अखेर परिस्थिती अशी पोहोचली की त्यांना आपल्या पदाचा राजीनामा देऊन देश सोडावा लागला.**

दरम्यान, बांगलादेशात सत्तापालट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. लष्कराच्या टँक देशाच्या मोठ्या भागात फिरत आहेत. आंदोलक पंतप्रधान कार्यालयात घुसले. सूत्रांच्या हवाल्याने असे सांगण्यात येत आहे की, लष्करानेच हसीनाचा राजीनामा मागितला होता. लष्करप्रमुखांनी सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक घेतली आहे. आंदोलकांनी 'लाँग मार्च टू ढाका'मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केल्यानंतर बांगलादेश सरकारने सोमवारी (5 ऑगस्ट) इंटरनेट पूर्णपणे बंद करण्याचे आदेश दिले. याच्या एक दिवस आधी पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या निदर्शक आणि सत्ताधारी पक्षाच्या समर्थकांमध्ये देशाच्या विविध भागात झालेल्या संघर्षात 100 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता. रविवारी सकाळी 'विद्यार्थी भेदभावाविरुद्ध' या बॅनरखाली आयोजित असहकार कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आंदोलक करण्यात आले. या आंदोलनात हिंसक वळण देखील आले. अवामी लीग, छात्र लीग आणि जुबो लीगच्या कार्यकर्त्यांनी त्यांना विरोध केला आणि त्यानंतर दोन्ही पक्षांमध्ये हाणामारी झाली. सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणाच्या मुद्द्यावरून आंदोलक हसिना यांच्या राजीनाम्याची मागणी करत होते. प्रथम आलो या बंगाली भाषेतील अग्रगण्य वृत्तपत्राने रविवारी झालेल्या चकमकीत 14 पोलिसांसह किमान 101 जण ठार झाल्याची माहिती मिळाली होती. हिंसाचारामुळे अधिकाऱ्यांना मोबाईल इंटरनेट बंद करण्यास आणि देशभरात अनिश्चित काळासाठी कर्फ्यू लागू करण्यास भाग पाडले.बांगलादेशमध्ये अराजकता माजली आहे. तिथल्या सरकारी नोकऱ्या व शिक्षणातील आरक्षणाविरोधातील आंदोलन हिंसक बनलं असून सोमवारी (५ ऑगस्ट) सकाळी शेख हसीना यांनी बांगलादेशच्या पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. त्यापाठोपाठ त्यांनी बांगलादेशमधून पलायन केलं असून त्या आता भारतात दाखल झाल्या आहेत. दुसऱ्या बाजूला आंदोलकांनी थेट शेख हसीना यांच्या कार्यालयावर हल्ला केला असून या परिसरात जाळपोळही केली आहे. देशातील गंभीर परिस्थिती पाहता बांगलादेशी लष्कराने देशाची कमान आपल्या हाती घेतली आहे. लष्करप्रमुख म्हणाले, "बांगलादेशमध्ये लवकरच अंतरिम सरकार स्थापन केलं जाईल". दरम्यान, शेख हसीना यांचे पुत्र साजिब अहमद वाजेद जॉय यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. साजिब अहमद वाजेद यांनी म्हटलं आहे की त्यांची आई शेख हसीना कदाचित आता बांगलादेशच्या राजकारणात परतणार नाही. बीबीसीशी बोलताना साजिब अहमद वाजेद यांनी सांगितलं की त्यांच्या आईने रविवारीच पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला होता. देशात बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी आतोनात प्रयत्न केले, तरी त्यांच्याविरोधात आंदोलन चालूच आहे. सरकारविरोधातील लोकांच्या टोकाच्या रोषामुळे निराश होऊन त्यांनी पंतप्रधानपद सोडण्याचा निर्णय घेतला. साजिब वाजेद हे काही वर्षांपूर्वी शेख हसीना यांचे सल्लागार म्हणून काम पाहायचे. साजिब वाजेद म्हणाले, माझ्या आईने आता वयाची सत्तरी पार केली आहे. त्यांनी कठोर परिश्रम घेतले तरी काही मोजक्या लोकांनी सरकारविरोधात बंड केलं. पाठोपाठ देशातील बहुसंख्य जनता त्यास बळी पडली आहे. त्यामुळे मला आता असं वाटतंय की त्या (शेख हसीना) आता बांगलादेशला परतणार नाहीत. माझ्या आईने देशाची कमान आपल्या हाती घेतल्यानंतर देशात अनेक सकारात्मक बदल घडवून आणले. आई पंतप्रधान झाली तेव्हा बांगलादेश हा जगातील अपयशी देशांच्या यादीत होता. हा एक गरीब देश मानला जात होता. परंतु, आता आपला देश आशिया खंडातील उदयोन्मुख देशांपैकी एक आहे.

### नवीन बांगलादेश निर्मिती

भेदभाव विरोधी विद्यार्थी चळवळ सोमवारी "लाँग मार्च ते ढाका" आयोजित करण्याची योजना आखत आहे. जी आधी एक दिवस नंतर आयोजित केली जाणार होती. चळवळीचे समन्वयक आसिफ महमूद यांनी रविवारी रात्री एका प्रसिद्धीपत्रकात सांगितले की, देशातील वाढत्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर बोलावलेल्या तातडीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणीबाणीच्या निर्णयात आमचा 'मार्च टू ढाका' कार्यक्रम 6 ऑगस्टऐवजी 5 ऑगस्टला होणार आहे. दुसऱ्या शब्दांत, आम्ही देशभरातील विद्यार्थ्यांना सोमवारी ढाका येथे येण्याचे आवाहन करत आहोत. त्यात सहभागी होण्याचे आवाहन करून ते म्हणाले, 'अंतिम लढाईची वेळ आली आहे. इतिहासाचा भाग होण्यासाठी ढाका येथे

---

# 77 जातींना ओबीसी दर्जा कोणत्या आधारावर दिला?

## सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारकडून उत्तर मागितले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज





**कोलकत्ता उच्च न्यायालयाने सोमवारी (5 ऑगस्ट) एक मोठा निर्णय घेतला आहे. पश्चिम बंगालमधील 77 मुस्लिम जातींना ओबीसी आरक्षण देण्याच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारकडून उत्तर मागितले आहे. ममता बनर्जी यांच्या सरकारच्या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती, त्यावर राज्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.**

आता राज्य सरकारने 77 जातींना ओबीसी दर्जा कोणत्या आधारावर दिला, असा सवाल न्यायालयाने केला आहे. यातील बहुतांश जाती मुस्लिम धर्माचे पालन करतात. मे महिन्यातच कोलकाता उच्च न्यायालयाने हे आरक्षण बेकायदेशीर ठरवून 77 जातींना ओबीसी यादीतून वगळण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सुप्रीम कोर्टातही वादविवाद झाले.

बंगाल सरकारच्या वकिलाने उच्च न्यायालयावरच जोरदार हल्ला चढवला. ओबीसी कोट्यासंदर्भात तयार करण्यात आलेल्या जातनिहाय यादीवर उच्च न्यायालयाच्या तीक्ष्ण टिप्पणीवर राज्य सरकारने आक्षेप व्यक्त केला. एवढेच नाही तर युक्तिवादादरम्यान बंगाल सरकारने सर्वोच्च न्यायालयाला विचारले की उच्च न्यायालयालाच राज्य चालवायचे आहे का?

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यादरम्यान बंगाल सरकारच्या वकील इंदिरा जयसिंग यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाने आपल्या मर्यादा ओलांडून हा निर्णय दिला आहे.

### कारण ते मुस्लिम आहेत?

या वर्षी मे महिन्यात उच्च न्यायालयाने 77 मुस्लिम जातींचा ओबीसी यादीत समावेश करण्याचा निर्णय फेटाळला होता. यासोबतच राजकीय स्वार्थ साधण्यासाठी मुस्लिम समाजाचा वापर कमोडिटी म्हणून केला जात असल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले होते. यावर आक्षेप व्यक्त करत बंगाल सरकारच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाला यात हस्तक्षेप करण्याची विनंती केली. बंगाल सरकार म्हणाले, 'असे का होत आहे? कारण ते मुस्लिम आहेत? ते म्हणतात हा धर्माचा विषय आहे. जे पूर्णपणे चुकीचे आहे. ते मुस्लिम असल्याने त्यांना आरक्षण दिल्याचे बोलले जात आहे.

# लेकाबरोबर मस्ती करताना दिसला सैफ अली

काही दिवसांपूर्वी अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चन अमेरिकेहून सुट्टी एन्जॉय करून लेक आराध्यासह मुंबईत परतल्याचं पाहायला मिळालं. यासंबंधिचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते. त्यानंतर आता बॉलीवूडमधील प्रसिद्ध पतौड कुटुंब युरोपमधील सुट्टी एन्जॉय करून परतलं आहे. महिन्याभरापूर्वी सैफ अली खान व करीना कपूर आपल्या मुलांसह युरोपमध्ये गेले होते. मोठी सुट्टी एन्जॉय करून आज सैफ-करीना मुंबईत परतले आहेत. मुंबई विमानतळावरील त्यांचे व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. सैफ अली खान व जेहच्या एका व्हिडीओने सध्या सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.युरोपमध्ये महिन्याभराची सुट्टी एन्जॉय करून आल्यानंतर मुंबई विमानतळावर करीना कपूर काळ्या रंगाच्या आऊटफिटमध्ये पाहायला मिळाली. तर सैफ अली खानचा डॅशिंग अंदाजात दिसला. त्याने ग्रे टी-शर्टबरोबर फिकट निळ्या रंगाची डेनिम जीन्स परिधान केली होती. याशिवाय करीना व सैफची दोन मुलं म्हणजे तैमूर व जेह पांढ्या रंगाच्या टी-शर्टमध्ये पाहायला मिळाले. यावेळी सैफ धाकटा लेक जेहबरोबर मस्ती करताना दिसला.'फिल्मी ग्रान' व 'विरल भयानी' या इन्स्टाग्राम पेजवर सैफ अली खान ( SAIF ALI KHAN ) व करीना कपूर यांचा मुंबई विमानतळावरील व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये सैफ अली खान जेहला उचलून त्याच्याशी मस्ती करताना दिसत आहे. सैफच्या या कृतीने सध्या सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे. हे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.या व्हिडीओवर एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, "हँडसम डॅड." तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, "जेह आज खूप आनंदी दिसतो." तसंच तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, "करीना खूप सुंदर दिसत आहे. व्वा." चौथ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, "सनग्लासेसमध्ये करीनाला



कोणीही टक्कर देऊ शकत नाही."दरम्यान, सैफ अली खान ( SAIF ALI KHAN ) व करीना कपूरच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, सैफ गेल्या वर्षी ओम राऊतच्या 'आदिपुरुष' चित्रपटात शेवटचा दिसला होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाला होता.

# श्वेता बच्चनला खूप ऐश्वर्याचा एक्स बॉयफ्रेंड

अभिनेत्री ऐश्वर्या राय (AISHWARYA RAI BACHCHAN) व तिचा पती अभिषेक बच्चन वेगळे राहत आहेत, असं म्हटलं जात आहे. ऐश्वर्या लेक आराध्याला घेऊन आई वृंदा रॉय यांच्याबरोबर राहतेय तर अभिषेक आई-वडिलांबरोबर राहत आहे. काही महिन्यांपूर्वीच ऐश्वर्याने सासर सोडलं, अशा चर्चा आहेत. दोघांच्या नात्याबद्दल सुरू असलेल्या या चर्चा अफवा आहेत की सत्य याबाबत ते दोघे किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणीही काहीच प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र ऐश्वर्या व तिची नणंद श्वेता बच्चन (SHWETA BACHCHAN) यांच्यात वाद असल्याच्या बातम्या येत राहतात.अनंत अंबानी व राधिका मर्चंटच्या लग्नात अभिषेक बच्चन त्याचे वडील अमिताभ बच्चन, आई जया बच्चन, बहीण श्वेता, तिचे पती निखिल नंदा, त्यांची मुलं अगस्त्य नंदा व नव्या नवेली नंदा यांच्याबरोबर आला होता. तर ऐश्वर्या मात्र लेक आराध्याला घेऊन नंतर या लग्नाला आलेली. तेव्हाही ऐश्वर्या व अभिषेक यांच्या नात्याची खूप चर्चा झाली. त्यांनी ग्रे डिव्होर्स घेतला आहे, असं म्हटलं जातंय. ऐश्वर्या व श्वेता बच्चन यांचं एकमेकींशी बिनसलं आहे, अशीही चर्चा आहे. पण एकेकाळी श्वेताला ऐश्वर्याचा एक्स बॉयफ्रेंड खूप आवडायचा.श्वेता बच्चन हिने स्वतःच याबाबत खुलासा केला होता. अमिताभ बच्चन यांची लेक श्वेता सिनेइंडस्ट्रीत आली नाही, ती अभिनयापासून दूर राहिली पण बॉलीवूडमध्ये तिचे अनेक मित्र आहेत. ती तिच्या आई-वडिलांबरोबर चित्रपटाच्या सेटवर जायची जिथे अनेक स्टार्स तिचे मित्र झाले. श्वेताला एक बॉलीवूड अभिनेता खूप आवडायचा. तो तिचा क्रश होता व तो तिच्या वहिनीचा म्हणजेच ऐश्वर्याचा एक्स बॉयफ्रेंड आहे. सलमान खान श्वेताचा क्रश होता आणि तिनेच एकदा याचा खुलासा केला होता.श्वेता बच्चन एकदा करण जोहरच्या 'कॉफी विथ करण' शोमध्ये गेली होती. या शोमध्ये तिने सलमान खानवर क्रश असल्याचं सांगितलं होतं.

# जिनिलीयाला दिल्या हटके शुभेच्छा

आपल्या सहज – सुंदर अभिनयाने सर्वांना भुरळ घालणाऱ्या जिनिलीया देशमुखचा आज ३७ वाढदिवस. २००३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'तुझे मेरी कसम' या चित्रपटातून जिनिलीयाने हिंदी मनोरंजन विश्वात पदार्पण केलं होतं. तिने या चित्रपटात पहिल्यांदाच रितेशबरोबर स्क्रीन शेअर केली होती. 'तुझे मेरी कसम' चित्रपटाच्या सेटवर दोघांमध्ये मैत्री झाली अन् पुढे या मैत्रीचं रुपांतर प्रेमात होऊन रितेश – जिनिलीयाने लग्नगाठ बांधली.एकमेकांना जवळपास १० वर्षे डेट केल्यावर जिनिलीया – रितेश २०१२ मध्ये विवाहबंधनात अडकले. या दोघांकडे मराठीसह बॉलीवूडमधली आदर्श जोडी म्हणून पाहिलं जातं. रितेश-जिनिलीयाचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. आज पत्नीच्या वाढदिवसानिमित्त रितेश देशमुखने खास पोस्ट शेअर करत बायकोला शुभेच्छा दिल्या आहेत.रितेशने यंदा जिनिलीयाच्या वाढदिवसानिमित्त मजेशीर व्हिडीओ शेअर केला आहे. लग्नाच्या आधी नवऱ्याचं प्रेम अन् लग्नानंतरचं प्रेम अशा दोन भागांमध्ये अभिनेत्याने हा व्हिडीओ शेअर केला आहे. सुरुवातीला लग्नाआधीच्या प्रेमात "तुम सा कोई प्यारा, कोई मासूम नहीं है" हे गाणं बॅकग्राऊंडला वाजतं. तर, लग्नानंतर "तुमने मेरी जिंदगी खराब की है" हे गाणं लागतं. यात रितेश जिनिलीयाची सेवा करत असल्याचं पाहायला मिळतंय. हा मजेशीर व्हिडीओ रितेश – जिनिलीयाच्या चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे.रितेशने हा मजेशीर व्हिडीओ शेअर केला असला तरी याला अभिनेत्याने रोमँटिक कॅप्शन दिलं आहे. "HAPPY BIRTHDAY बायको...



# माझ्या हृदयाच्या खूप जवळ असणारा सिनेमा

अभिनेत्री रिंकू राजगुरू (RINKU RAJGURU) ही सध्या तिच्या 'झिम्मा 2' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. 'झिम्मा-2' हा चित्रपट 24 नोव्हेंबर रोजी रिलीज होणार आहे. रिंकूच्या या आगामी चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. झिम्मा-2 या चित्रपटानंतर रिंकू ही आणखी एका चित्रपटामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटामधील लूकचा फोटो शेअर करुन रिंकूनं या चित्रपटाचं नाव चाहत्यांना सांगितलं आहे. रिंकू ही आशा या आगामी चित्रपटामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटामधील लूकचा फोटो रिंकूनं सोशल मीडियावर शेअर केला आहे. या फोटोमध्ये रिंकू ही हिरवी साडी,गळ्यात मंगळसूत्र आणि चेहऱ्यावर स्माईल अशा लूकमध्ये दिसत आहे. या फोटोला रिंकूनं कॅप्शन दिलं, "आशा हा चित्रपट माझ्या हृदयाच्या खूप जवळ आहे. आमच्या अतिशय खास प्रोजेक्टचं पूर्ण झाला आहे. लवकरच भेटू!" रिंकूनं शेअर केलेल्या या फोटोनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. रिंकूनं शेअर केलेल्या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. आता रिंकूच्या आशा या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.

# रिचानं नेटकऱ्यांचे टोचले कान



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री ऐश्वर्या रॉय ही काही दिवसांपूर्वी एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आली होती. तिनं पॅरिसच्या फॅशन वीकमध्ये रॅम्प वॉक केले होते. त्यातील काही फोटो व्हायरल झाले होते. त्यावरुन ऐश्वर्याला ट्रोल करण्यात आले होते. या सगळ्यात अभिनेत्री रिचानं ऐश्वर्याची बाजू घेतली आहे. यापूर्वी ऐश्वर्या आणि रिचानं सरबजितमध्ये एकत्र काम केले होते. त्या चित्रपटामध्ये रणदीप हुडानं केलेली भूमिका लोकप्रिय ठरली होती. रणदीपच्या भूमिकेचे मोठ्या प्रमाणावर कौतुकही झाले होते. ऐश्वर्या जेव्हा त्या पॅरिसच्या रॅम्प वॉकमध्ये सहभागी झाली होती तेव्हा तिला ट्रोल करण्यात आले होते. या सगळ्यावर ऐश्वर्यानं तिला ट्रोल करणाऱ्यांवर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. फुकरे तीन मधून भोली पंजाबनच्या भूमिकेत असणाऱ्या रिचाची

# चोप्रा, फोगट अन् हॉकी सेमीफायनलमध्ये!

## सोमवारी भारताच्या हातातून दोन पदकं निसटली

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पॅरिस ऑलिम्पिकच्या दहाव्या दिवशीही भारताच्या पदकसंख्येत कोणतीही वाढ झाली नाही. सोमवारी भारताच्या हातातून दोन पदकं निसटली. भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनकडून पदकाची अपेक्षा होती पण त्याला चांगल्या खेळीनंतरही पराभव पत्करावा लागला.. कांस्यपदकाच्या लढतीत त्याला मलेशियाच्या ली जी जियाने पराभूत केले. नेमबाजीत महेश्वरी चौहान आणि अनंतजित सिंग नारुका या जोडीला स्कीट मिक्स सांघिक स्पर्धेत कांस्यपदकाच्या लढतीत १ गुणाने चीनकडून पराभव पत्करावा लागला.**



कुस्तीपटू निशा दहियाच्या उजव्या हाताला दुखापत झाली. त्यामुळे आघाडी घेतल्यानंतरही महिलांच्या ६८ किलो वजनी गटातील कुस्तीच्या उपांत्यपूर्व फेरीत तिला उत्तर कोरियाच्या पाक सोल गमकडून पराभव पत्करावा लागला. भारतीय महिला टेबल टेनिस संघाने रोमानियाचा पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. तर भारताचा धावपटू अविनाश साबळेने ३००० मी. अडथळा शर्यतीत अंतिम फेरी गाठली आहे. पॅरिसमध्ये भारताने आतापर्यंत केवळ तीन पदके जिंकली आहेत. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारतीय हॉकी संघाने अप्रतिम कामगिरी केली आहे. ४ ऑगस्ट रोजी ग्रेट ब्रिटनशी झालेल्या सामन्यात पेनल्टी शूटआऊटमध्ये ग्रेट ब्रिटनचा ४-२ असा पराभव करून उपांत्य फेरीत स्थान निश्चित केले. पॅरिस ऑलिम्पिकच्या उपांत्य फेरीत भारतीय हॉकी संघाचा सामना वर्ल्ड चॅम्पियन जर्मनीशी होणार आहे. दरम्यान रविवारी (४ ऑगस्ट) जेव्हा भारताचा विजय झाला, तेव्हा या सामन्याचे समालोचन करणाऱ्या सुनील तनेजा यांना कॉमेंट्री करत असतानाच रडू कोसळलं. भारत जिंकलाय, आपण उपांत्य फेरीत पोहोचलय, हे सांगताना त्यांना अश्रू अनावर झाले आणि ते ढसाढसा रडू लागले. या घटनेचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. भारताचा खेळाडू अमित रोहिदास याला रेड कार्ड दिल्यानंतर अवघ्या १० खेळाडूंसह सामना खेळत भारतीय संघाने विजय मिळविला. त्यामुळे हा विजय सर्वांसाठीच खास बनला. ऑलिम्पिक हॉकी संघाचे अधिकृत प्रक्षेपण करणाऱ्या वाहिनीवर सुनील तनेजा हे हिंदीतून कॉमेंट्री करत होते. यावेळी पेनल्टी शूटआऊटमध्ये जसा जसा एक-एक गोल भारताकडून होत होता, तसा लाखो चाहत्यांप्रमाणेच तनेजा यांचाही उत्साह शिगेला पोहोचत होता. जेव्हा राजकुमार यांनी निर्णायक शेवटचा गोल केला, तेव्हा आनंदाच्या भरात भारत जिंकल्याचे सांगताना सुनील तनेजा यांना अश्रक्षः रडू कोसळले."भारत उपांत्य फेरीत पोहोचला आहे. भारत उपांत्य फेरीत पोहोचला आहे", असे ओरडून ओरडून सांगितल्यानंतर सुनील तनेजा ढसाढसा रडू लागले. त्यानंतर त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना सावरून घेतलं. द खेल इंडिया या एक्स अकाऊंट युजरने हा व्हिडीओ चित्रीत करून पोस्ट केला. जो आता सुनील तनेजा यांनीही शेअर केला आहे.भारतीय पुरुष हॉकी संघाने गोलरक्षक पी. आर. श्रीजेशच्या भक्कम कामगिरीच्या जोरावर ऑलिम्पिक हॉकी स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत भारताने रविवारी ग्रेट ब्रिटनचे आव्हान नियोजित वेळेतील १-१ अशा बरोबरीनंतर शूटआऊटमध्ये ४-२ असे परतवून लावले.

### पाल यांचे प्रयत्न यशस्वी ठरले

ग्रेट ब्रिटनच्या खेळाडूविरुद्ध स्टिक उगारल्याने भारताच्या अमित रोहिदासला लाल कार्ड दाखवून थेट बाहेर काढण्यात आले. त्यानंतरही दहा खेळाडूंसह खेळताना ४० मिनिटे भारताने धैर्याने लढत देत ग्रेट ब्रिटनला १-१ असे बरोबरीत रोखले. शूटआऊटमध्ये दोन्ही संघांच्या पहिल्या दोन प्रयत्नांनंतरही २-२ अशी बरोबरी कायम होती. पण, नंतर पुन्हा एकदा श्रीजेश भारतासाठी धावून आला. त्याने कॉनर विल्यम्स आणि फिलिप रॉपरचे प्रयत्न फोल ठरवून भारताचा विजय निश्चित केला. भारताकडून हरमनप्रीत, सुखजीत सिंग, ललित उपाध्याय, राजकुमार पाल यांचे प्रयत्न यशस्वी ठरले.पॅरिस ऑलिम्पिकच्या दहाव्या दिवशीही भारताच्या पदकसंख्येत कोणतीही वाढ झाली नाही. सोमवारी भारताच्या हातातून दोन पदकं निसटली. भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनकडून पदकाची अपेक्षा होती पण त्याला चांगल्या खेळीनंतरही पराभव पत्करावा लागला..

# भविष्यात रोबोट पदक जिंकू शकतात का?

## युसूफ डिकेकच्या प्रश्नावर एलॉन मस्क यांचे भन्नाट उत्तर

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये तुर्कियेचा नेमबाज युसूफ डिकेकची चर्चा काही थांबायला तयार नाही. एक हात खिशात आणि एका हातात पिस्तुल धरून नेम धरल्याचा त्याचा फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला. कोणतेही इतर उपकरणे न वापरता युसूफने ५१ व्या वर्षी सहजपणे रौप्य पदक जिंकले, त्यामुळे त्याच्यावर अनेक मिम्स तयार केले गेले. एका दिवसात युसूफ डिकेक जगभरात चर्चेचा विषय ठरला. आता युसूफने एलॉन मस्क यांना विचारलेल्या एका प्रश्नाची चर्चा होत आहे.**



अतिशय शांत आणि संयम राखून खेळ सादर करणाऱ्या युसूफने मस्कला एक्स या साईटवर विचारले, "भविष्यात ऑलिम्पिकमध्ये रोबोट सहभागी होऊन मेडल जिंकू शकतील का? आणि तेही एक हात खिशात घालूनतर विषय असा आहे की, युसूफ डिकेकने एलॉन मस्क यांना आवाहन करताना म्हटले होते की, एलॉन, भविष्यात रोबोट एक हात खिशात घालून ऑलिम्पिकमध्ये मेडल जिंकू शकतील काय? तुला याबद्दल काय वाटतं? आणि आपण या विषयावर इस्तंबूलमध्ये चर्चा केली तर कसे राहिल." युसूफ डिकेकच्या या प्रश्नानंतर एलॉन मस्क यांनीही त्याला भन्नाट उत्तर दिले.एलॉन मस्क म्हणाले की, होय, रोबोट प्रत्येकवेळी अचूक नेम शाधू शकतात. त्यानंतर आणखी एक पोस्ट करून युसूफच्या इस्तंबूल येथे येण्याच्या निमंत्रणाबाबतही मस्क यांनी उत्तर दिले. "मला इस्तंबूलNE यायला आवडेल. जगातील सर्वात सुंदर शहरापैकी ते एक शहर आहे. युसूफ डिकेकने १० मीटर एअर पिस्तुल मिश्र सांघिक स्पर्धेत सहभाग घेतला होता.

### क्रीडा प्रकारात भाग घेऊ शकतात का?

त्याने या स्पर्धेत रौप्यपदक मिळविले आहे. युसूफच्या रुपाने तुर्कियेला पहिले रौप्यपदक मिळाले. मात्र युसूफच्या साधेपणाचा स्वॅग जगातील अनेकांना आवडला. सोशल मीडियावर त्याचे मिम्स होऊ लागले. लोक त्याचे फोटो शेअर करून, कौतुक करू लागले. त्यामुळे एका रात्रीत युसूफ डिकेक आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेचा विषय ठरला.५१ वर्षीय युसूफने आतापर्यंत चारवेळा ऑलिम्पिकमध्ये सहभाग घेतला आहे. २००८, २०१२, २०१६ आणि २०२० मध्ये त्याने तुर्कियेचे प्रतिनिधित्व केले आहे. ही त्याची पाचवी ऑलिम्पिक स्पर्धा होती. युसूफचा जन्म तुर्कियेमध्ये १९७३ साली झाला. लहान असतानाच त्यांना नेमबाजीची आवड निर्माण झाली. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये आतापर्यंत सहभाग घेतलेला आहे. तेव्हाकुठे आता त्यांना रौप्यपदक जिंकता आले. युसूफ डिकेक आणि एलॉन मस्क यांची चर्चा गंमतीचा भाग असली तरी त्यातून भविष्यातील क्रीडा प्रकारांबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे. खरंच रोबोट भविष्यात क्रीडा प्रकारात भाग घेऊ शकतात का?